**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे






वर्ष ५ । अंक २४३ । बुधवार २४ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322


### काकासाहेब म्हस्के होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज स्थलांतर प्रकरण

## पंधरा किलोमीटर परिसरात कॉलेज स्थलांतरीत करण्याची विद्यार्थ्यांची मागणी

**व्यवस्थापन–विद्यार्थ्यांच्या बैठकीत तोडगा नाही । दोन दिवसांनी होणार अंतिम निर्णय**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बोल्हेगाव फाटा येथील काकासाहेब म्हस्के होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजचे स्थलांतर करण्याचा निर्णय कॉलेजच्या व्यवस्थापनाने जाहीर केल्याच्या पार्श्वभूमीवर आज, गुरुवारी व्यवस्थापन व विद्यार्थी-पालकांची बैठक चास येथे कॉलेजमध्ये पार पडली. त्यात कॉलेज बंद करून ते दुस-या संस्थेत विलीन करण्याचा स्पष्ट मनोदय व्यवस्थापनाने व्यक्त केला, तर विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन नगरच्या पंधरा किलोमीटर परिसरात कॉलेज ठेवावे, अशी आग्रही मागणी विद्यार्थी व पालकांच्या वतीने करण्यात आली. बैठकीत वादळी चर्चा होऊन अखेर अंतिम निर्णय होऊ शकला नाही. त्यामुळे येत्या दोन दिवसांत यासंद्रर्भात निर्णय घेऊ, असे व्यवस्थापनाच्या वतीने विद्यार्थी-पालकांना सांगण्यात आले.

काकासाहेब म्हस्के होमिओपॅथिक मेडिकल, फार्मसी व नर्सिंग कॉलेज हे नगर जिल्ह्यातील जुनी व नामवंत कॉलेज म्हणून ओळखले जाते. परंतु संस्था बंद करून हे दुस-या संस्थेला चालवायला देण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतला आहे. त्यामुळे सुमारे आठशे विद्यार्थी व ५० कर्मचारी वर्गाच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

गेल्या काही दिवसांपासून कॉलेजचे स्थलांतर करून हे कॉलेज जवळपास हलविण्यात येणार असल्याचे बोलले जात होते. परंतु मंगळवारी रात्री अचानक कॉलेजच्या ग्रूपवर व्यवस्थापनाने आपले कॉलेज भिगवण (ता. इंदापूर जि. पुणे) परिसरातील चिंचोली येथे शिफ्ट होणार असल्याचे सांगितले. अचानक घेतलेल्या या निर्णयाने विद्यार्थ्यांमध्ये खळबळ उडाली असून, संताप व्यक्त होत आहे.

कॉलेजचे अचानक स्थलांतर करण्याचा घाट घातला गेल्याने विद्यार्थी व पालकवर्ग हतबल झाला आहे. यासंदर्भात आज झालेल्या बैठकीत विद्यार्थी व पालकांनी आपली आग्रही भूमिका मांडून व्यवस्थापनाला जाब विचारला. तर व्यवस्थापनाने हे कॉलेज बंद करणार असल्याचे स्पष्टपणे सांगितले. कॉलेज स्थलांतरीत करायचे असेल तर ते नगर परिसरात पंधरा किलोमीटर अंतराच्या आत करा, अशी मागणी विद्यार्थी व पालकांनी केली. परंतु या परिसरातील कोणत्याही संस्थेने तशी तयारी दाखवली नसल्याचे सांगत व्यवस्थापनाने यासंदर्भात येत्या दोन दिवसांत विद्यार्थी व पालकांना माहिती देऊ, असे सांगितले. त्यामुळे यावर काय अंतिम निर्णय होतो, याकडे लक्ष लागले आहे.

## धर्मवीर संभाजी महाराज जयंतीचा फ्लेक्स काढल्याने दिल्लीगेट भागात तणाव

**हिंदू धर्मियांचा रस्ता रोको । आंदोलकांपुढे प्रशासन हतबल । फ्लेक्स जागेवर लावला**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मुस्लिम धर्मियांचा मोहरम आणि हिंदू धर्मियांचे दैवत छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती शुक्रवारी एकाच दिवशी येत असल्याने अहिल्यानगर शहराचे आमदार संग्राम भैय्या जगताप यांचा फोटो आणि धर्मवीर संभाजी महाराज यांचा फोटो असलेला फ्लेक्स दिल्लीगेट परिसरात लावण्यात आला होता. मुस्लिम धर्मियांच्या मोहरम मिरवणूक मार्गावरच हा फ्लेक्स असल्याने या फ्लेक्सची मोठ्या प्रमाणावर शहरात चर्चा होती. पोलीस प्रशासनाच्या वतीने सदर फ्लेक्स सायंकाळच्या सुमारास काढण्यात आला. या फ्लेक्समुळे मिरवणूक मार्गावर तथा शहरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये याची खबरदारी म्हणून ही कारवाई करण्यात आल्याचे कळते. फ्लेक्स काढण्यात आल्याची माहिती कळताच आमदार संग्राम भैय्या जगताप यांचे कार्यकर्ते तसेच हिंदू समर्थकांनी अचानक दिल्ली गेट चौकात रस्ता रोको आंदोलन करून वाहतूक ठप्प केली. या संदर्भातील माहिती समजताच पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले.

मात्र आंदोलनकर्त्यांनी पुन्हा जागेवर फ्लेक्स लावा असा पवित्रा घेतल्याने पोलीस प्रशासनाने आंदोलकांपुढे हतबल होत, अखेर काढलेला फ्लेक्स पुन्हा जागेवर लावून दिला. फ्लेक्स पुन्हा जागेवर लावल्याने परिसरातील तणाव निवळला.

## मानसिक त्रास दिला जात असल्याची निंबळकमधील दिव्यांग कीर्तनकाराची तक्रार

**हभप जालिंदर महाराज निकम यांचे एसपींना निवेदन । दिव्यांग कायद्यांतर्गत कारवाईची मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील निंबळक येथील हरीहर संस्थेचे प्रमुख आणि ज्येष्ठ कीर्तनकार हभप डॉ. जालिंदर महाराज निकम यांना एका व्यक्तीकडून जीवे मारण्याची धमकी आणि सोशल मीडियावरून मानसिक त्रास दिला जात असल्याचा प्रकार घडत असून, याप्रकरणी जालिंदर महाराज यांनी जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे लेखी तक्रार दाखल करून कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, हरिहर संस्थेच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या आळंदी, पैठण आणि पंढरपूर ■ पान ४ वर

## ट्रॅक्टर भाड्याने पाहिजे अशी पोस्ट टाकून फसवणारा भामटा जेरबंद

**एमआयडीसी पोलिसांची कारवाई, ९ लाखांचे दोन ट्रॅक्टर जप्त**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** फेसबुकवर ट्रॅक्टर भाड्याने पाहिजे अशी पोस्ट टाकून दरमहा आकर्षक भाडे देण्याचे आमिष दाखवायचे आणि लोकांचा विश्वास संपादन करून त्यांचे ट्रॅक्टर हडप करायचे, अशा पद्धतीने फसवणूक करणाऱ्या एका सराईत भामट्याला एमआयडीसी पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. मल्हार गहिनीनाथ जायभाये (वय ३२, रा. थाटे, ता. शेवगाव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून ९ लाख रुपये किमतीचे दोन ट्रॅक्टर हस्तगत करण्यात आले आहेत.

याबाबत बापूसाहेब नानासाहेब शिंदे (रा. खांबे, ता. संगमनेर, हल्ली रा. नवनागापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. आरोपी मल्हार जायभाये याने वीजप्रवाहाच्या तारा ओढण्यासाठी शिंदे यांचा जॉन डियर कंपनीचा ट्रॅक्टर (क्र. १७ ४५२३) भाड्याने नेला होता. मात्र, त्यानंतर ट्रॅक्टरचे भाडे न देता आणि ट्रॅक्टर परत न करता त्यांची फसवणूक केली. या तक्रारीवरून पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि डीएसपी शिरीष वमने यांच्या ■ पान ४ वर

## रंजना शेंडगे यांचे निधन

**नगरसेवक संजय शेंडगे यांना मातृशोक**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महानगरपालिकेचे नगरसेवक संजय छगनराव शेंडगे यांच्या मातोश्री रंजना छगनराव शेंडगे यांचे आज दिनांक २५/६/२०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे.


मृत्यूसमयी त्या ७२ वर्षांच्या होत्या. कै. रंजना शेंडगे यांच्यावर दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास नालेगाव, अमरधाम येथे अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. दिवंगत रंजना शेंडगे यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या माजी महापौर रोहिणीताई शेंडगे यांच्या त्या सासू होत्या.

## शिर्डीत एफडीएची पुन्हा मोठी कारवाई; प्रसादाच्या पेढ्यांच्या विक्री केंद्रांवर धाडी

**। लाखो रुपयांचा साठा नष्ट । दोन लाख रुपयांचे ६०० किलो निकृष्ट दर्जाचे पेढे जप्त करून केले नष्ट!**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**


**शिर्डी–** प्रसादाच्या नावाखाली भाविकांच्या श्रद्धेशी आणि आरोग्याशी खेळ करणार्या पेढा व्यावसायिकांवर अन्न व औषध प्रशासनाने पुन्हा एकदा मोठी कारवाई केली आहे. साईमंदिर परिसरातील खासगी पेढा विक्री केंद्रे आणि पेढा उत्पादन करणार्या आस्थापनांवर टाकलेल्या धाडीत ६०० किलोहून अधिक निकृष्ट दर्जाचा व संशयित पेढा जप्त करून जागेवरच नष्ट करण्यात आला. या पेढ्यांची किंमत सुमारे दोन लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून शिर्डीत प्रसाद म्हणून विकल्या जाणार्या पेढ्यांच्या दर्जाबाबत गंभीर तक्रारी समोर येत होत्या.



त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने यापूर्वीही काही ठिकाणी कारवाई करून नमुने तपासणीसाठी पाठविले होते. मात्र बुधवारी करण्यात आलेल्या व्यापक धाडसत्रात निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांचा मोठा साठाच उघडकीस आल्याने प्रसाद व्यवसायातील गैरप्रकार पुन्हा एकदा समोर आला आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकार्यांनी सकाळपासूनच साईमंदिर परिसरातील विविध पेढा विक्री ■ पान ४ वर

## आयुक्त मुंढेंच्या बदलीच्या चर्चांना पूर्णविराम

**आमदार दातेंच्या लक्षवेधीवर मंत्र्यांची स्पष्ट ग्वाही**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्यभरात भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट दुग्धजन्य पदार्थ, गुटखा, तंबाखू आणि निकृष्ट दर्जाच्या खाद्य वस्तूंविरोधात अन्न व औषध प्रशासन विभागाने सुरू केलेल्या धडक कारवाईच्या पार्श्वभूमीवर विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या संभाव्य बदलीबाबत विविध स्तरावर चर्चा सुरू होती. मात्र, पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना अन्न व औषध प्रशासन मंत्री ना. नरहरी झिरवाळ यांनी ''तुकाराम मुंढे यांची बदली करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही'' अशी स्पष्ट ग्वाही दिल्याने या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.

पावसाळी अधिवेशन २०२६ दरम्यान आमदार काशिनाथ दाते यांनी राज्यातील वाढत्या भेसळीच्या प्रकारांकडे सरकारचे लक्ष वेधले. मे आणि जून महिन्यात अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यभर टाकलेल्या धाडीत भेसळयुक्त दूध, दुग्धजन्य पदार्थ, खाद्यतेल, पेढा, गुळ, चहा पावडर, आंबा पिकविण्याची पावडर, गुटखा, तंबाखू, सुगंधी सुपारी, मावा तसेच इतर निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांचा कोट्यवधी रुपयांचा साठा जप्त करण्यात आल्याचा मुद्दा त्यांनी सभागृहात मांडला. तसेच अशा कारवायांमुळे विभागाचा दबदबा वाढला असून राज्यातील भेसळ माफियांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी आमदार दाते यांनी विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या धडक मोहिमेचा उल्लेख करत, ही मोहीम पुढेही सुरू राहणार का आणि आयुक्तांची बदली करण्याचा कोणताही विचार शासनाच्या पातळीवर आहे का, असा थेट सवाल उपस्थित केला.

त्यावर उत्तर देताना मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले की, भेसळयुक्त अन्नपदार्थांविरोधातील मोहिमेअंतर्गत राज्यभरातून १,९३० नमुने विश्लेषणासाठी ताब्यात घेण्यात आले आहेत. तसेच शासकीय व वैद्यकीय संस्थांमध्ये वापरासाठी आणण्यात आलेल्या निर्जंतुक न केलेल्या सर्जिकल ■ पान ४ वर

## वेदपाठशाळा व वैदिक कार्यासाठी राज्य शासनाच्या अनुदानाची गरज - सुधीरदास महंत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्रातील सुमारे सव्वाशे वेदपाठशाळांची आर्थिक स्थिती नाजूक असल्याने शासनाकडून अनुदानाची गरज आहे, त्याचबरोबर वैदिक कार्यातील विद्वानांकरिता महाराष्ट्र शासनाने पुरस्कार सुरु करावेत, अशी मागणी नाशिकच्या काळाराम मंदिराचे प्रमुख विश्वस्त सुधीरदास महंत महाराज यांनी आज येथे केली. आंध्र प्रदेश, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश सारख्या अनेक राज्यांमध्ये वैदिक कार्यासाठी या प्रकारचे अनुदान आणि पुरस्कार दिले जातात. महाराष्ट्रात आज सुमारे १५ हजारांहून अधिक विद्यार्थी वेदपाठशाळांमध्ये वैदिक अध्ययन करत आहेत, अशी माहिती देखील त्यांनी यावेळी दिली. आम्ही सारे ब्राह्मण आणि ब्राह्मण व्यावसायिक पत्रिकेच्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने ब्राह्मण भूषण पुरस्कार सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. यावेळी खासदार मेधा कुलकर्णी, मासिकाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी, व्यवस्थापकीय संचालक संजय ओर्पे व पुरस्कारार्थी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी नसरापूर प्रकरणातील स्व. वेदवती शुभम कुलकर्णी या चिमुरडीला श्रध्दांजली वाहण्यात आली.



वेदाची परंपरा खूप प्राचीन आहे याला कोणीही निर्माण केले नाही तर ते ऋषीमुनींनी कँटस्थ करून शिष्य परंपरेने आजपर्यंत समाजापर्यंत पोहोचले आहेत असे हे कठीण काम असून त्याचे जतन करणे हे आपले कर्तव्य आहे याच भावनेतून आम्ही श्रीक्षेत्र काशी येथे कोणतीही अपेक्षा न ठेवता दंडक्रम पारायण केले आणि ते वेदमूर्ती देवव्रत यांनी पूर्ण केले हे परंपरा जपून ठेवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन घनपाठी महेश रेखे यांनी यावेळी केले

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दृकश्राव्य माध्यमातून पुरस्कारार्थींना शुभेच्छा दिल्या. दण्डक्रम पारायणाचा विक्रम रचणारे वेदमूर्ती देवव्रत रेखे यांना ब्राह्मण भूषण पुरस्काराने यावेळी गौरविण्यात आले, त्यांच्यासोबत वेदमूर्ती महेश रेखे उपस्थित होते. विठ्ठल रखुमाई मूर्ती, पुणेरी पगडी, उपरणे, मानपत्र आणि रोख रुपये २५ हजार असे पुरस्काराचे स्वरुप होते. याशिवाय ह. भ. प. अमृता करंबेळकर यांना डॉ रामचंद्र देखणे स्मृती युवा कीर्तनकार पुरस्कार, थिंक बँकचे संपादक व युवा उद्योजक विनायक पाचलग यांना इंदुमती-वसंत करिअर भूषण पुरस्कार आणि ९६ वर्षांची परंपरा असलेल्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाला भगवान परशुराम ब्राह्मण संस्था पुरस्काराने गौरविण्यात आले. कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे अध्यक्ष अमित शहाणे व त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी हा पुरस्कार स्विकारला. या तिनही पुरस्कारांचे स्वरुप सन्मानचिन्ह, शाल व रोख रु. दहा हजार असे होते. यावेळी मंजिरी धुपकर लिखित गुरु-शिष्य संवाद (दासबोध) या ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. ब्राह्मणांसाठी असलेल्या सुयश वधू-वर सूचक मंडळाच्या नव्या संकेतस्थळाचे उद्घाटन यावेळी करण्यात आले.

यावेळी बोलतांना सुधीरदास महाराज पुढे म्हणाले की, वैदिक कार्यामध्ये ब्राह्मण समाजाबरोबरच अन्य ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### पारगाव मौलाच्या चिमुकल्यांसाठी उघडले 'आशेचे द्वार'!

अहिल्यानगर- नावातच सकारात्मकता असलेल्या पुणे येथील 'आशेचे व्दार प्रतिष्ठान'ने नगर तालुक्यातील पारगाव मौला जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी खरोखरच आशेचे नवे द्वार खुले केले आहे. संस्थेच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग, वॉटर बॉटल, नोटबुक्स, पेन, पेन्सिल आणि रबर किट अशा संपूर्ण शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. नव्या कोऱ्या साहित्यासोबतच चॉकलेट आणि बिस्किटे मिळताच मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यासारखा होता.या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष जोसेफ पवार, खजिनदार प्रशांत खावडिया, सचिव सचिन जाधव, सुपरवायझर रघुनाथ हुंबरे, स्वयंसेवक दीपक क्षेत्रे व ग्रामपंचायत सदस्य अमोल खेडकर उपस्थित होते. तसेच ज्येष्ठ साहित्यिक कवी बाळासाहेब नेटके, प्रा. गोरख अंबरीत, सामाजिक कार्यकर्त्या कविता नेटके आणि नवनाथ बोठे यांनी उपस्थित राहून संस्थेच्या या कौतुकास्पद कार्याचा गौरव केला.शाळेचे मुख्याध्यापक सुभाष धामणे व शिक्षिका रुखिया तांबोळी यांनी आभार मानले. पुण्याच्या संस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या पंखांना दिलेले हे बळ कौतुकास पात्र ठरत आहे.

### अण्णांच्या कर्मभूमीला 'संविधान-पसायदान संगमभूमी' घोषित करण्याचा जनलोक संकल्प



अहिल्यानगर - ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे सार्वजनिक जीवन हे भारतीय संविधानातील पारदर्शक, जबाबदार आणि लोकाभिमुख शासनमूल्ये तसेच संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानातील सर्वजनहिताय, सर्वभूतहिताय विचारांचा जिवंत संगम आहे. म्हणूनच पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने अण्णा हजारे यांच्या कर्मभूमीला 'संविधान-पसायदान संगमभूमी' म्हणून घोषित करण्याचा जनलोक संकल्प केला असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी दिली. हा उपक्रम गुरुवार, दि. २६ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता हुतात्मा स्मारक येथे आयोजित करण्यात आला आहे. या प्रसंगी अण्णा हजारे यांना विशेष मानवंदना दिली जाणार करण्यात असून, त्यांच्या कर्मभूमीला संविधान आणि पसायदानाच्या संयुक्त चेतनेचे प्रतीक म्हणून गौरविण्यात येणार आहे. ॲड. गवळी म्हणाले की, भारतीय संविधानाने देशाला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चार मूलभूत दिशा दिल्या; तर संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाने सर्व जीवांच्या कल्याणाची, सद्बुद्धीची आणि विश्वबंधुत्वाची अंतःप्रेरणा दिली. अण्णा हजारे यांच्या आयुष्यभराच्या लोकसेवेने या दोन्ही प्रवाहांना प्रत्यक्ष कर्मयोगाचे रूप दिले आहे. माहिती अधिकार चळवळ, ग्रामविकास, भ्रष्टाचारविरोधी जनजागृती, स्वच्छ व पारदर्शक प्रशासनाची मागणी, तसेच लोकशाहीतील नैतिकता यांसाठी अण्णांनी केलेले कार्य हे संविधानिक मूल्यांचे जनआंदोलनात झालेले रूपांतर आहे. त्याचबरोबर त्यांची निस्वार्थ लोकसेवा, साधेपणा आणि सर्वांच्या कल्याणाची भूमिका ही पसायदानातील कर्मभक्तीची जिवंत अभिव्यक्ती असल्याचे ॲड. गवळी यांनी म्हंटले आहे. या पार्श्वभूमीवर अण्णा हजारे यांची कर्मभूमी ही केवळ एका व्यक्तीच्या कार्याची भूमी नसून, संविधानाच्या बाह्य न्यायव्यवस्थेचा आणि पसायदानाच्या अंतर्मन परिवर्तनाच्या तत्त्वज्ञानाचा संगम घडविणारी प्रेरणाभूमी आहे, अशी भूमिका आयोजकांनी व्यक्त केली. या जनलोक संकल्प कार्यक्रमास लोकशाहीप्रेमी नागरिक, कार्यकर्ते, वकील, विद्यार्थी, शेतकरी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि पसायदान-संविधान विचारांचे समर्थक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने करण्यात आले आहे. या जनलोक संकल्पासाठी ॲड. गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले आणि प्रकाश गोसावी आदी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

## श्री ढोकेश्वर कॉलेजमध्ये जागतिक योग दिन उत्साहात साजरा




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर येथे ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. 'एक पृथ्वी, एक आरोग्य' या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाची सुरुवात योग प्रार्थनेने करण्यात आली. यानंतर विविध योगासने, प्राणायाम तसेच ध्यानधारणा यांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. योग प्रशिक्षकांनी नियमित योगाभ्यासाचे शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व विशद केले. तसेच तणावमुक्त जीवनासाठी योग हा प्रभावी मार्ग असल्याचे सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्यडॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात योग ही भारताची प्राचीन परंपरा असून निरोगी जीवनासाठी योगाचा अंगीकार करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना (), क्रीडा विभाग आणि विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक, कर्मचारी व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. योग दिनाच्या निमित्ताने उपस्थितांनी नियमित योगाभ्यासाचा संकल्प करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. वीरेंद्र धनशेट्टी यांनी केले तर आभार एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय सुरोशी यांनी केले.

## जिल्ह्यातील तीन लाख विद्यार्थ्यांना मोफत अबॅकस शिक्षण

## गणिताचे भविष्य घडविणारा उपक्रम - आनंद भंडारी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** जिल्हा परिषद शिक्षण विभाग, अहिल्यानगर आणि एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमधील सुमारे तीन लाख विद्यार्थ्यांना मोफत अबॅकस शिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गणितीय क्षमतेचा विकास, मानसिक गणनशक्ती वृद्धिंगत करणे आणि तार्किक विचारक्षमता वाढविण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या महत्त्वाकांक्षी ''माझी शाळा-माझे अबॅकस'' उपक्रमाचा समारोप नुकताच जिल्हा परिषद मुख्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादा भाऊ गुंजाळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, अकॅडमीच्या मार्गदर्शिका डॉ. कल्पना अशोक घडेकर, दोन राष्ट्रपती पदकांनी सन्मानित शिक्षक डॉ अमोल बागुल यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.

यावेळी उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीची माहिती देणाऱ्या विशेष वेबपेजचे प्रकाशन करण्यात आले. तसेच जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये अबॅकस प्रशिक्षण प्रभावीपणे राबविणाऱ्या उत्कृष्ट अबॅकस शिक्षिका सौ.सुवर्णा ठोकळ यांचा सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थित सर्व मान्यवरांचा स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारे वृक्ष देऊन गौरव करण्यात आला. यावेळी शिक्षिका स्वाती रेपाळे अंकिता सानप आदी उपस्थित होत्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले की,''ग्रामीण आणि शहरी भागातील लाखो विद्यार्थ्यांपर्यंत अबॅकससारखे आधुनिक गणितीय शिक्षण पोहोचविणे ही अत्यंत उल्लेखनीय बाब आहे. विद्यार्थ्यांची एकाग्रता, स्मरणशक्ती, तार्किक विचार आणि मानसिक गणन क्षमता विकसित करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरला आहे. येणाऱ्या पिढ्यांचे गणितीय भविष्य घडविणारा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी असून अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन जिल्हा परिषद शाळांमध्ये सातत्याने व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## शिक्षण क्षेत्रात काम करणे हे महान कार्य आहे - पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक यांचा जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या वतीने सन्मान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शाळा महाविद्यालयाशी आयोजित संवाद मेळाव्यात सुदर्शन हे आपले मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त करत असताना त्यांनी, आपण सर्व प्राचार्य मुख्याध्यापक, शिक्षक एक महान काम करीत असून ज्ञानदानासोबत विद्यार्थी विशेषता विद्यार्थिनींची मानसिक, शारीरिक सुरक्षा करणे ही देखील आपली महत्त्वाची सामाजिक जबाबदारी आहे. आपण सर्वजण मिळून अध्ययन आणि अध्यापन आनंदात होईल विद्यार्थी निर्भयपणे आपले शिक्षण घेईल यासाठी शहरातील सर्व शाळा महाविद्यालय यांचे प्राचार्य, मुख्याध्यापक यांनी निर्भया पथकास सहकार्य करावे. आम्ही आपल्या नेहमी समवेत असून, कोणत्याही क्षणी आपण आम्हास संपर्क करू शकता. त्याची आधुनिक सुविधा आपण केलेली आहे. डॉक्टर दिलीप टिपरसे, वैभव कलुबमे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थी सुरक्षेसाठी विविध सूचना सर्वांना केल्या.

याप्रसंगी सर्व मुख्याध्यापकांच्या वतीने पोलीस अधीक्षक यांचा शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनिल पंडित, शहराध्यक्ष ज्ञानदेव बेरड, उपाध्यक्ष अशोक डोळसे,, मुख्या. श्रीमती ठोकळ, श्रीमती अनुरूरिता झगडे, मुख्या. भालसिंग सर, सचिव शिवाजीराव घाडगे, बाबासाहेब शिंदे, श्रीकृष्ण पवार आदींनी मिळून केला.

यावेळी मुख्याध्यापक संघाचे राज्य अध्यक्ष प्राचार्य सुनिल पंडित यांनी शहरातील सर्व शाळा आपल्या सोबत असून आपल्या या अनोख्या आणि महाराष्ट्रातील आदर्श उपक्रमाचा साठी आम्ही नेहमी सहकार्य करू. शिक्षण क्षेत्रातील या सर्वांशी आपण उत्तम संवाद साधला असून, यापुढे आपण विद्यार्थी हितासाठी विद्यार्थी प्रिय उपक्रम, विद्यार्थ्यांचे संबोधन, त्यांचे अधिकार याबद्दल समुपदेशन करू असे आवर्जून सांगितले. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती ठोकळ, श्रीमती झगडे, मुख्याध्यापक अशोक डोळसे, शेख समी उपप्राचार्य यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

## मोहरमच्या पार्श्वभुमीवर शहरातील ४३२ जणांवर तडीपारची कारवाई

**मिरवणुक मार्गावर मोठा पोलिस बंदोबस्त राहणार । सीसीटीव्ही कॅमेरे, ड्रोन कॅमेराद्वारे राहणार करडी नजर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मोहरमच्या पार्श्वभुमीवर ४३२ जणांवर तडीपारची कारवाई करण्यात आली आहे तर १३ दारु विक्री करणाऱ्यांकडून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र ६ महिन्यांकरीता घेण्यात आले आहे. मोहरम उत्सव चांगल्या प्रकरणात आणि शांततेत साजरा व्हावा यासाठी प्रशासनाच्या वतीने ५३ शांतता कमिटी अथवा मोहल्ला कमिटी जातीय सलोखा, धर्मगुरु-यंग पार्टी, सवारी बसविणारे डीजे चालक आणि मालकांची बैठक घेऊन चुना करण्यात आल्या आहेत.

मोहरमच्या अनुशंगाने हद्दीत कोंबींग ऑपरेशन, दंगाकाबु योजना , रुट मार्च, मॉक ड्रिल घेण्यात आले. शहरात ड्रोन कॅमेरे आणि सीसीटीव्ही कॅमेराद्वारे मोहरम उत्सवावर करडी नजर ठेवण्यात येणार आहे. या उत्सवावर पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलिस अधीक्षक-२, उपअधीक्षक-५, पोलिस निरीक्षक-२१, सपोनी-६०, पोलिस अंमलदार-८५०, एसआरपीएफव आरसीपी प्लाटुन होमगार्ड-१५०, असा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

## जागतिक योग दिनानिमित्तच्या निबंध स्पर्धेस मुदतवाढ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जागतिक योग दिनानिमित्त येथील योग विद्याधाम, कोहिनूर मॉल व श्रीपाद टॉईज फयांच्या संयुक्त विद्यमाने भव्य निबंध स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेसाठी निबंध दि. २० जून पर्यंत जमा करावयाचे होते. ती मुदतवाढ आता ३० जूनपर्यंत वाढविण्यात आली आहे अशी माहिती योग्य विद्या धामचे अध्यक्ष डॉक्टर सुंदर गोरे यांनी दिली.

या स्पर्धेसाठी मिडीया पार्टनर आय लव्ह नगर आहे. ही स्पर्धा खुला गट व शालेय गट अशा दोन गटांमध्ये घेतली जात आहे. खुल्या गटासाठी आत्म्याशी मैत्री करण्याचा मार्ग अष्टांग योग, आधुनिक जीवनशैली आणि योग साधना ,योग केवळ शारीरिक व्यायाम की जीवन पद्धती व योग- संस्कृतीकडून समृद्धीकडे आणि विज्ञानातून अध्यात्माकडे या विषयावर घेण्यात येत आहे . तर शालेय गटासाठी निरोगी जीवनाची गुरुकिल्ली - योग, योगाभ्यासाचे आरोग्यासाठी महत्त्व व शालेय जीवनात योगाचे महत्त्व या विषयावर ही स्पर्धा आहे

या स्पर्धेसाठी शब्द मर्यादा ४०० ते १००० शब्द ठेवलेली आहे. या स्पर्धेमध्ये मराठी हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये तुम्हाला निबंध लिहिता येतात . विजयी स्पर्धकांना प्रथम, द्वितीय,तृतीय व उत्तेजनार्थ पारितोषिके दिली जाणार आहेत. तसेच नाव नोंदणी करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकांना ही बक्षीसे दिले जाणार आहेत.

स्पर्धकांनी आपले निबंध आता २० जून पर्यंत योग विद्या धाम कुष्ठधाम रोड , ज्ञानेश्वर ड्रायव्हिंग स्कूलच्या मागे, सावेडी येथे जमा करावयाचे आहेत .या स्पर्धेसाठी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे . नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ८२३७८२९१३७ किंवा ९३ २६ ९४ ० १ ३६ या नंबर वर संपर्क साधावा तसेच या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त लोकांनी व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आव्हान योग विद्या धाम चा पूजा गांधी यांनी केले आहे.

## श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यानिमित्त वारकऱ्यांना सर्व सुविधा द्या – माजी सभापती घुले



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक असलेल्या विश्वगुरू संत श्री निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेने वारकऱ्यांसाठी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी माजी सभापती तथा अहिल्यानगर जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शनिवार दि. ११ जुलै २०२६ रोजी विश्वगुरू संत श्री निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळा सालाबादप्रमाणे सुमारे ६० ते ७० हजार वारकरी व भाविकांसह हमाल पंचायत, हमाल भवन आणि मार्केट यार्ड परिसरात दोन दिवस मुक्कामासाठी थांबणार आहे. तसेच रविवार दि. १२ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत श्री निवृत्तीनाथ महाराजांचा ७२९ वा समाधी सोहळा मोठ्या भक्तिभावाने संपन्न होणार आहे.

अहिल्यानगर शहरातच हा समाधी सोहळा हजारो वारकरी व भाविकांच्या उपस्थितीत पार पडत असल्याने मार्केट यार्ड परिसरातील सर्व रस्त्यांचे तातडीने डांबरीकरण व दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सोहळा ज्या रस्त्यावर होणार आहे त्या ठिकाणी वॉटरप्रूफ मंडप उभारावेत, तसेच भाविकांच्या सोयीसाठी बसण्याकरिता कार्पेट व चटईची व्यवस्था करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय महानगरपालिकेमार्फत मार्केट यार्ड व लगतच्या परिसराची विशेष स्वच्छता मोहीम राबवावी, फिरती स्वच्छतागृहे उपलब्ध करून द्यावीत, महिलांसाठी स्वतंत्र स्नानगृहाची व्यवस्था करावी, घंटागाड्या, प्रकाशयोजना, शुद्ध पिण्याचे पाणी, औषधोपचार पथके, आरोग्य सुविधा आणि इतर आवश्यक सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

पालखी सोहळ्याच्या ठिकाणी कुलर, फॅन, २६५ केव्ही जनरेटर व्हॅन, साउंड सिस्टिम, स्वागत कमानी, आकर्षक लाईट व्यवस्था आणि पालखी सजावट महानगरपालिकेमार्फत करण्यात यावी. तसेच पालखी आगमनापासून ते प्रस्थान होईपर्यंत एकाही वारकरी किंवा भाविकाची गैरसोय होणार नाही, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी, असेही घुले यांनी निवेदनात म्हटले आहे.

सोहळा संपल्यानंतर हमाल भवन व संपूर्ण मार्केट यार्ड परिसरात जंतुनाशक औषध फवारणी, डास प्रतिबंधक धूर फवारणी आणि विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

याबाबत बोलताना माजी सभापती अविनाश घुले म्हणाले की, ''विश्वगुरू संत श्री निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळा हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून महाराष्ट्राच्या संत परंपरेचा आणि वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचा महान सोहळा आहे.

## राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटनेच्या पुणे प्रादेशिक विभाग उपाध्यक्षपदी बलभिम कुबडे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटना, अहिल्यानगर शाखेची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच टिळक रोड येथील कामगार कार्यालयाच्या कॉ. मधुकर कात्रे सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीत एसटी महामंडळातील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बलभिम कुबडे यांची नंदुरबार येथे झालेल्या वार्षिक अधिवेशनात राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटनेच्या पुणे विभागाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघाचे सरचिटणीस कॉ. आनंदराव वायकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि कार्याध्यक्ष अर्जुन बकरे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली. बैठकीला अहिल्यानगर विभागाचे सचिव गोरख बेळगे, जिल्हाध्यक्ष गंगाधर कोतकर, खजिनदार विठ्ठल देवक, एसटी बँकेचे माजी संचालक ज्ञानदेव अकोलकर, शिवाजीराव कडूस, कामगार नेते उत्तमराव रणसिंग यांच्यासह एसटी महामंडळातील निवृत्त कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कॉ. आनंदराव वायकर यांच्या हस्ते बलभिम कुबडे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना उपस्थितांनी कुबडे यांच्या संघटनात्मक कार्याचा गौरव करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी कॉ. आनंदराव वायकर म्हणाले की, ''एसटी महामंडळातील निवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांची जाणीव ठेवून बलभिम कुबडे यांनी सातत्याने निष्ठापूर्वक काम केले आहे. सेवानिवृत्त कामगारांच्या विविध समस्यांवर संघटितपणे आंदोलन, पाठपुरावा आणि चर्चा करून त्यांनी अनेक प्रश्न सोडविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या कार्यक्षमतेवर आणि नेतृत्वावर विश्वास ठेवून संघटनेने त्यांच्यावर प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आहे. ही निवड केवळ एका व्यक्तीची नसून सर्वसामान्य निवृत्त कामगारांच्या प्रतिनिधित्वाची निवड आहे.''

पुढे बोलताना त्यांनी कुबडे आपल्या कार्यक्षेत्रातील निवृत्त एसटी कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे संघटनेसमोर मांडतील आणि ते सोडविण्यासाठी कटिबद्ध राहतील असा विश्वास व्यक्त केला. बैठकीदरम्यान निवृत्त कर्मचाऱ्यांच्या वेतन, निवृत्तीवेतन, वैद्यकीय सुविधा, प्रलंबित आर्थिक लाभ तसेच इतर कल्याणकारी योजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. उपस्थित सदस्यांनी संघटनेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करत भविष्यातही संघटनेबरोबर सक्रियपणे राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### संगीत परीक्षेत शौर्य देशमुख केंद्रात प्रथम



अहिल्यानगर - अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने एप्रिलमे २०२६ सत्रात घेण्यात आलेल्या संगीत परीक्षा (तबला) मध्ये चि.शौर्य वैभव देशमुख यांनी प्रवेशिका पूर्ण (तबला) परीक्षेत विशेष योग्यतेसह केंद्रात प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. चि.शौर्य यांना या यशासाठी आरोही संगीत विद्यालयाचे संचालक स्वप्निल खराडे व शितल खराडे यांच्यासह वडील वैभव देशमुख व आई सौ. कल्पना देशमुख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. चि.शौर्य याच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून त्यांचे पालक, नातेवाईक व मित्रपरिवार यांच्याकडून कौतुक होत आहे.

### सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी यांची कोल्हापूरच्या अखिल भारतीय संवाद परिषदेच्या अध्यक्षपदी



अहिल्यानगर - राजर्षी शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'लोकराजा राजर्षी शाहू महाराज पहिले अखिल भारतीय संवाद परिषद'च्या अध्यक्षपदी साहित्य, समाजकारण आणि लेखा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे अहिल्यानगरचे सुपुत्र सीए (डॉ.) प्रा. शंकर घनशामदास अंदानी यांची निवड करण्यात आली आहे. शुक्रवार, दि. २६ जून रोजी कोल्हापूर येथील दसरा चौकातील मोहामेडन एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात हा भव्य सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. गंगाधर कोल्हापूर यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात 'लोकराजा राजर्षी शाहू पुरस्कार-२०२६' वितरण समारंभाचेही आयोजन करण्यात आले आहे. याकार्यक्रमाला पद्मश्री उदय देशपांडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. परिषदेत राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्य, सामाजिक सुधारणा, शिक्षणविषयक धोरणे आणि समतावादी विचारसरणीवर विविध तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. परिषदेचे संयोजक कमलाकर वर्टेकर यांनी ही माहिती दिली. सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी यांनी मराठी आणि हिंदी साहित्य क्षेत्रात केलेल्या भरीव कार्यामुळे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. साहित्य क्षेत्रात त्यांनी अनेक अभूतपूर्व विक्रमांची नोंद केली असून एकाच दिवशी तब्बल १०६ स्वलिखित पुस्तकांचे प्रकाशन करण्याचा जागतिक विक्रम त्यांच्या नावावर आहे. याशिवाय 'आई' या विषयावर आधारित ५,१२१ कवितांचा जगातील सर्वात मोठा हिंदी काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा मानही त्यांनी मिळविला आहे. आजवर त्यांनी लिहिलेल्या १२ हजार १०० हून अधिक कवितांचे विविध ग्रंथांमधून प्रकाशन झाले असून या कार्याची स्वतंत्र जागतिक विक्रम म्हणून नोंद करण्यात आली आहे. मराठी साहित्याला नवे आयाम देत त्यांनी 'वडील : बाबा अबोल जीवनाचे कोडे' या शीर्षकाखाली महाराष्ट्रातील ८० कवींच्या १,१६१ कवितांचे संकलन करून भव्य काव्यसंग्रह प्रकाशित केला. तसेच 'बहिण माझी प्रिय ताई' या नावाने बहिणीवरील १,१६१ कवितांचे स्वतंत्र संकलन प्रकाशित करून कौटुंबिक नातेसंबंधांवरील साहित्याला नवी दिशा दिली आहे. अंदानी यांच्या या विक्रमी साहित्यिक कार्याची दखल लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्ससारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी घेतली आहे. त्यांच्या नावावर विविध जागतिक विक्रमांची नोंद करण्यात आली असून साहित्य क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा गौरव जगभरात झाला आहे. साहित्य क्षेत्राबरोबरच समाजसेवेतही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मंदिरे, मस्जिद, चर्च, धर्मशाळा तसेच विविध सामाजिक संस्थांना अत्यल्प मानधनात किंवा विनामूल्य लेखा व करसल्लागार सेवा देऊन त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे.

---

**अहिल्याबाई होळकर जन्मत्रिशताब्दी वर्षानिमित्त**

# पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाच्या पारितोषिक वितरण सोहळ्याचे २७ जून रोजी आयोजन

**राज्यस्तरीय वकृत्व, चित्रकला व निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा होणार गौरव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दी वर्षानिमित्त विचार भारती संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवांतर्गत विविध राज्यस्तरीय स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या महोत्सवामध्ये राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि निबंध स्पर्धा यशस्वीरीत्या संपन्न झाल्या असून या स्पर्धांतील विजेत्या स्पर्धकांचा गौरव व पारितोषिक वितरण सोहळा शुक्रवार, दिनांक २७ जून रोजी सायंकाळी ४ वाजता न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमासाठी सुप्रसिद्ध शिवचरित्रकार डॉ. अशोक बांगर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य प्रा. डॉ. बाळासाहेब सागडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती स्पर्धाप्रमुख चंद्रकांत तागड यांनी दिली.

यावेळी बोलताना चंद्रकांत तागड म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सांस्कृतिक महोत्सवाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आणि युवकांना अहिल्याबाई होळकर यांचे जीवनचरित्र, त्यांचे दूरदर्शी नेतृत्व, लोककल्याणकारी प्रशासन, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा समजून घेण्याची संधी मिळाली.

ते पुढे म्हणाले की, अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व अभिव्यक्तीला व्यासपीठ मिळते, तसेच इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचे कार्य नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचते. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे जीवन हे आदर्श नेतृत्व, लोकसेवा आणि संस्कारांचे प्रेरणादायी उदाहरण असून त्यांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे.

विचार भारती संस्थेच्या वतीने सर्व स्पर्धक, विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी या पारितोषिक वितरण सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

# माळी वधू वर सूचक वेबसाईटचे उद्घाटन संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सकल माळी समाजाने सुरू केलेल्या वधू-वर कार्यालयाचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे.वेबसाईट ही काळाची गरज आहे.वधु वर कार्यालयाची वेबसाईट सुरू झाल्याने जिल्ह्यातील व राज्यातील सर्व समाज जोडण्याचे काम या वेबसाईटमुळे होईल.तसेच वधू-वरांची माहिती अल्पावधीतच घरबसल्या सर्वांना होईल.माळी वधू वर कार्यालयातील सर्व पदाधिकारी निस्वार्थपणे,बहुमूल्य असा वेळ देऊन समाजासाठी अत्यंत तळमळीने काम करीत आहेत.ही कौतुकास्पद बाब आहे. वेबसाईट सुरू झाल्याने माळी वधु वर कार्यालयाची आधुनिकतेकडे वाटचाल मोठ्या दिमाखात सुरू झाली आहे.असे प्रतिपादन ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी केले आहे.

माळीवाडा येथे पेमराज गुगळे हायस्कूल मध्ये सकल माळी समाज ट्रस्ट संचालित माळी वधू वर सूचक कार्यालयात वेबसाईटचे उद्घाटन ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांच्या हस्ते संपन्न करण्यात आले.याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत उत्कर्ष कॉम्प्युटरचे डायरेक्टर नितीन अनारसे,इंडियन मेडिकल असो. चे माजी अध्यक्ष डॉ.अनिल आठरे,नगरसेवक दत्ता गाडळकर, महेंद्र पडोळे,सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ,माळी वधू वर सूचक नोंदणी कार्यालयाचे अध्यक्ष राजाराम चिपाडे, उपाध्यक्ष संजय ताजणे,सचिव सुदाम बोरुडे, खजिनदार रमेश चिपाडे,माजी नगरसेवक अर्जुन बोरुडे,सुरेश आंबेकर,समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे,विश्वस्त विनोद पुंड, डॉ.रणजीत सत्रे,राजेंद्र पडोळे,कोअर कमिटी सदस्य अनिल इवळे,अमोल भांबरकर, रोहित पठारे,मच्छिंद्र बनकर, चंद्रकांत पुंड,सुधीर पुंड,प्रकाश इवळे,विष्णुपंत म्हस्के,बजरंग भूतारे,अशोक आगरकर, श्याम व्यवहारे, राजेंद्र ताठे, सुरेश कावळे,राजेंद्र झोडगे, संजय झोडगे, रामदास फुले,नारायण इवळे, संजय कानडे,सुधाकर कानडे,गणेश कोल्हे,प्रसाद कोके, अरुण गाडळकर,अर्जुन गोंधळे, प्रकाश रासकर, दत्तात्रय वारकड,माळी महासंघाचे पदाधिकारी नंदू नेमाने,मनोज भुजबळ,विवेक फुलसौंदर, मनोज फुलसौंदर,गणेश धाडगे,किरण रासकर, दिनेश कापरे, अतुल जाधव, सुरेखा घोलप, कल्याणी गाडळकर आदींसह समाज बांधव उपस्थित होते.

नितीन अनारसे म्हणाले,माळी वधू वर कार्यालय हे समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी सुरू झाले आहे.दोन वर्षांमध्ये या वधू-वर कार्यालयाची मोठी प्रगती झाली आहे.नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी वधू-वर कार्यालयासाठी जागा दिली आहे.तसेच वधू-वर कार्यालय डिजिटल पद्धतीने सुरू व्हावे यासाठी डॉ.अनिल आठरे यांनी संगणक उपलब्ध करून दिला आहे.उत्कर्ष इंटरप्राईजेस च्या वतीने सॉफ्टवेअरचे काम केल्याने माळी वधू वर कार्यालयाची वेबसाईट सुरू होऊन ऑनलाईन पद्धतीने काम सुरू झाले आहे.यामुळे वधू वर कार्यालयाचे काम जलद गतीने सुरू राहील. डॉ.अनिल आठरे म्हणाले,वधू वर कार्यालयाचे ऑनलाइन पद्धतीने काम सुरू झाल्याने आनंद होत आहे.सामाजिक कामांसाठी वेळ देणारी माणसे या कार्यालयात काम करीत असल्याने चांगल्या पद्धतीने समाजाचे काम होत आहे. एकमेकांना मदत करायला, सुखदुःखात कोणालाही वेळ नाही.प्रत्येक जण मोबाईल मध्ये व्यस्त आहे.तरीदेखील समाजासाठी बहुमूल्य वेळ देणारी मंडळी वधू-वर कार्यालयासाठी योगदान देत आहेत ही कौतुकास्पद बाब आहे.

माळी वधू वर कार्यालयाच्या वेबसाईट चे काम उत्कर्ष एंटरप्राईजेस चे डायरेक्टर नितीन अनारसे यांनी विनामूल्य करून दिल्याबद्दल त्यांचा सकल माळी समाजाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माळी वधु वर कार्यालयाची पदाधिकारी अशोक हिंगे, भास्कर चौधरी,दत्तात्रय शिंदे,पंडित औसरकर,अनिल लोंढे आदींनी परिश्रम घेतले आहे.

---

# जायकवाडी खूनप्रकरणाचा २४ तासांत उलगडा

**विधी संघर्षग्रस्त बालकासह एकाला ताब्यात; पीएसआय भारत मोरे यांचा तपास**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** जायकवाडी उत्तर धरण परिसरात घडलेल्या युवकाच्या खूनप्रकरणाचा अवघ्या २४ तासांत उलगडा करण्यात एमआयडीसी पैठण पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणात एका विधी संघर्षग्रस्त बालकासह एका युवकाला ताब्यात घेण्यात आले असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भारत मोरे करीत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ जून रोजी जायकवाडी उत्तर धरण परिसरात एका युवकाचा खून करून त्याचा मृतदेह काटेरी झुडपांमध्ये टाकण्यात आला होता. याप्रकरणी एमआयडीसी पैठण पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा शोध घेतला. तपासादरम्यान एका विधी संघर्षग्रस्त बालकाचा तसेच शेरा उर्फ बबन खंदारे (वय २३) याचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर दोघांनाही ताब्यात घेण्यात आले.

प्राथमिक तपासात दोघांनी मिळून युवकाचा खून करून मृतदेह झुडपात फेकल्याचे समोर आले आहे. विधी संघर्षग्रस्त बालकास किशोर न्याय मंडळासमोर हजर करण्यात आले असून, तर शेरा उर्फ बबन खंदारे याच्याकडे पुढील चौकशी सुरू आहे. पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पैठण पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली. खूनासारख्या गंभीर गुन्ह्याचा अवघ्या २४ तासांत उलगडा केल्याने पोलिस पथकाचे कौतुक होत आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भारत मोरे करीत आहेत.

---

# दादरमध्ये अवलंबलेली पार्किंग व्यवस्था अहिल्यानगर महापालिकेने अवलंबावी - श्रीनिवास बोज्जा

**नो पार्किंग ठिकाणी लाल काळे पट्टे मारावे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पार्किंग बाबत सुचवलेली सूचना मुंबई महानगरपालिकेने दादर मध्ये अवलंबिली त्या प्रमाणे अहिल्यानगर महानगरपालिकेने ही अवलंबावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा यांनी एका पत्रकानव्ये केली आहे.

सध्या अहिल्यानगर महानगरपालिकेच्या क्षेत्रात रस्त्यावर व इतरत्र कोठेही नागरिकांनी आपली दुचाकी व चारचाकी गाडी पार्किंग केल्यास मोठा दंड आकरले जाते . वास्तविक पाहता नागरिकांना आपली गाडी कुठे पार्क केली तर दंड आहे व कोठे पार्क केली तर दंड नाही याची माहिती नाही व तसे महानगरपालिकेनेही कोणतेही सूचना फलक लावले नाही त्या मुळे नागरिकांना विनाकारण मोठे आर्थिक भुर्दंड सोसावे लागते, या साठी नुकतेच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्य सरकार व मुंबई महानगरपालिकेला आवाहन केल्या प्रमाणे दादर मध्ये अंमलबजावणी केली.

या करिता ज्या ठिकाणी पार्किंग करावयाचे नाही त्या ठिकाणी लाल काळे पट्टे मारावे म्हणजे नागरिकांच्या लक्षात येईल की या ठिकाणी पार्क करू नये, त्या मुळे नागरिकांनाही विनाकारण भुर्दंड सोसावा लागणार नाही व वाहतूक व्यवस्थेलाही मोठी मदत होईल. सर्रासपणे नागरिक कुठेही वाहने पार्किंग करतात मात्र पार्किंग आणि नो पार्किंग क्षेत्र कोणती आहेत हे सहजपणे ओळखण्यासाठी लाल आणि काळ्या रंगाचे पुटपाथ म्हणजे नो पार्किंग आणि पिवळ्या काळ्या रंग म्हणजे पार्किंग असे नागरिकांच्या लक्षात येईल व विनाकारण नागरिकांचे होणारे आर्थिक नुकसान टळेल, त्यामुळे जर लाल काळ्या रंगाची पट्टी असलेल्या भागात वाहन पार्क केली तर मोठी दंडात्मक कारवाई होऊ शकते व पिवळ्या आणि काळ्या रंगाच्या फुटपाथसमोर पार्किंगला परवानगी असणार आहे. या करिता अहिल्यानगर महानगरपालिकेने शहरात व गर्दीच्या ठिकाणी जेथे जेथे पार्किंग करू नये अशा ठिकाणी लाल काळे पट्टे मारून त्या ठिकाणी नागरिकांनी आपले वाहने पार्किंग करू नये असे आवाहन करावे व तसे फलक ठीक ठिकाणी लावावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा यांनी केली आहे.

---

# भाजपा युवा मोर्चा नगर उत्तर जिल्हा उपाध्यक्षपदी महेश पवार यांची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** भारतीय जनता युवा मोर्चा अहिल्या नगर उत्तर जिल्हा उपाध्यक्ष पदी महेश पवार यांची निवड करण्यात आली, नेवासा तालुक्यातील अंमळनेर येथून समाजसेवेची सुरवात करणारे महेश पवार हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे स्वयंसेवक असून यापूर्वी त्यांच्यावर भाजपा युवा मोर्चा नेवासा तालुका चिटणीस, भाजपा युवा मोर्चा जिल्हा सचिव, भाजपा युवा मोर्चा जिल्हा कोषाध्यक्ष पदाची जबाबदारी होती,या पदावर असताना त्यांनी परिसरातील अनेक गावामध्ये रुक्षारोपण,आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, शालेय साहित्य वाटप,ईश्रम कार्ड शिबीर, कोरोना काळात गरजूवंत नागरिकांना मोफत किराणा किट, अर्से निक अल्बम गोळ्यांचे वाटप असे अनेक उपक्रम राबवले आहे,या कामाची दखल घेत पक्षांश्रेष्टींनी त्याच्यावर जिल्हा उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपावली आहे. या निवडीबद्दल सर्वासामान्यांना न्याय देणार..पक्षश्रेष्टींनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाला तडा जाऊ न देता,भारतीय जनता पार्टी चे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी काम करणार आहे, तसेंच शेतकरी, कामगार व सर्वसामान्य लोकांना न्याय मिळून देण्यासाठी जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी यापुढे देखील कार्यरत राहणार असल्याचे महेश पवार यांनी सांगितले.

---

**शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिराच्यावतीने**

# श्री संत सावताश्रम शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले विद्या मंदिरातील विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर** – श्री संत सावताश्रम शिक्षण संस्था ही गेली अनेक वर्षे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असून, शिक्षण हा या कार्याचा केंद्रबिंदू आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाबरोबरच त्यांच्यासाठी आवश्यक असलेली मूलभूत साधनेही उपलब्ध करून देणे ही संस्थेची जबाबदारी आहे. या उपक्रमांतर्गत श्री विशाल गणेश देवस्थान ट्रस्टने पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना शालेय गणवेश आणि वह्यांचे वाटप केल्याबद्दल आम्ही त्यांच्या आभारी आहोत. समाजातील अशा संस्थांच्या सहकार्यामुळेच गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणात स्थैर्य लाभते, असे प्रतिपादन चेअरमन बाळासाहेब बोराटे यांनी केले.

शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश देवस्थानच्या वतीने श्री संत सावताश्रम शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले विद्या मंदिरातील विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेश आणि वह्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी देवस्थान अध्यक्ष ऍड अभय आगरकर ट्रस्टचे उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, विश्वस्त पांडुरंग नन्नवरे, चंद्रकांत फुलारी, नितीन पुंड यांच्यासह संस्थेचे चेअरमन तथा नगरसेवक बाळासाहेब बोराटे ,कार्याध्यक्ष विष्णू फुलसौंदर, विष्णू म्हस्के, मुख्याध्यापक राजकुमार शिंदे ,राजीव घोलप उपस्थित होते.

संस्थेचे कार्याध्यक्ष विष्णू फुलसौंदर म्हणाले की, आज मिळालेल्या या वह्या केवळ कागदाच्या स्वरूपात नसून त्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या भविष्यासाठी एक नवा आत्मविश्वास आणि प्रेरणा घेऊन आल्या आहेत. शिक्षणासाठी कोणतीही गोष्ट लहान नसते, आणि त्यामागे असलेली सद्भावना विद्यार्थ्यांच्या मनात खोलवर जाते. संस्थेच्या वतीने अशा उपक्रमांना सदैव पाठबळ दिले जाईल. विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्याच्या या कार्यात एकत्र येणं ही काळाची गरज असून, भविष्यात अशा सामाजिक भान असलेल्या उपक्रमांचे प्रमाण वाढावे, हीच अपेक्षा आहे.

यावेळी बोलताना देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर की, श्री गणेश हे विघ्नहर्ता आहेत, आणि समाजातील अनेक अडथळे दूर करून सर्वांना सुख-समाधान प्राप्त व्हावे, यासाठी श्री विशाल गणेश देवस्थानच्या वतीने समाजोपयोगी उपक्रम राबवले जात आहेत. आपण केवळ पूजाअर्चा करणार्या संस्थेपुरते सिमित न राहता, सामाजिक जाणीव राखत गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचविणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांना वह्या, शालेय साहित्य देताना त्यांच्या चेहर्यावर उमटलेला आनंद हा आमच्यासाठीच खरा प्रसाद आहे, असे त्यांनी नमूद केले. आजच्या विद्यार्थ्यांमध्ये उद्याचे नेता, वैज्ञानिक, डॉक्टर, अभियंते आहेत. त्यांना योग्य वेळी प्रेरणा व आधार दिला तर ते निश्चितच उज्ज्वल भारताचे शिल्पकार ठरतील. देवस्थानच्या वतीने असे उपक्रम यापुढेही सातत्याने राबवले जातील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक राजकुमार शिंदे सूत्रसंचालन राजीव घोलप यांनी केले.

---

# जागतिक बाजारपेठेत भारताचे वाढते महत्त्व; एसुसचे उपाध्यक्ष अर्नाल्ड सु यांचे अहिल्यानगरमध्ये मराठमोळे स्वागत

**'एआय' तंत्रज्ञानाच्या नव्या युगात एसुस आघाडीवर; श्री कॉम्प्युटरला अर्नाल्ड सु यांची भेट**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर** – भारत ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी बाजारपेठ बनली असून जागतिक स्तरावर लाँच होणारी अनेक उत्पादने आता भारतातही त्याच दिवशी उपलब्ध होत आहेत. भारतीय ग्राहकांची वाढती क्रयशक्ती, तंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारी आणि डिजिटल क्षेत्रातील झपाट्याने होत असलेली प्रगती यामुळे भारताचे महत्त्व जागतिक बाजारपेठेत सातत्याने वाढत असल्याचे प्रतिपादन एसुस कंपनीचे उपाध्यक्ष अर्नाल्ड सु यांनी केले.

तब्बल १४ वर्षांनंतर अर्नाल्ड सु यांनी अहिल्यानगर येथील श्री कॉम्प्युटर दालनाला भेट दिली. यावेळी त्यांनी व्यावसायिक, ग्राहक तसेच संगणक क्षेत्रातील जाणकारांशी संवाद साधत भारतीय बाजारपेठेतील संधी, नव्या तंत्रज्ञानाचे बदलते स्वरूप आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रातील आगामी वाटचालीबाबत आपले विचार मांडले. त्यांच्या आगमनानिमित्त श्री कॉम्प्युटरचे संचालक विशाल जगताप व जगताप कुटुंबीयांनी पारंपरिक महाराष्ट्रीयन पद्धतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

माध्यमांशी बोलताना अर्नाल्ड सु म्हणाले की, भारतीय ग्राहकांनी एसुसवर दाखविलेल्या विश्वासामुळे कंपनी आज भारतातील ग्राहक नोटबुक श्रेणीतील दुसऱ्या क्रमांकाचा ब्रँड बनली आहे. ग्राहकांच्या अपेक्षा आणि बदलत्या गरजा लक्षात घेऊन कंपनी सातत्याने नवनवीन तंत्रज्ञान विकसित करत असून जागतिक दर्जाची उत्पादने भारतीय ग्राहकांपर्यंत तत्परतेने पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयच्या वाढत्या गरजांचा विचार करून एसुसने सर्व्हर, लॅपटॉप आणि डेस्कटॉपची विस्तृत श्रेणी विकसित केली आहे. क्वालकॉमसोबत भागीदारी करत एआय ऑल-इन-वन पीसी सादर करणारी एसुस ही जगातील पहिली कंपनी ठरली असल्याचे त्यांनी



नमूद केले. आगामी काळात एआय आधारित तंत्रज्ञान प्रत्येक भारतीय ग्राहकापर्यंत पोहोचविण्यासाठी कंपनी कटिबद्ध असून संशोधन आणि नवोपक्रमांवर विशेष भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी श्री कॉम्प्युटरचे संचालक विशाल जगताप यांनी अर्नाल्ड सु यांचे स्वागत करून त्यांची उपस्थित व्यावसायिक आणि ग्राहकांशी ओळख करून दिली. कार्यक्रमात एसुसच्या अधिकाऱ्यांनी अत्याधुनिक संगणक तंत्रज्ञान, एआय आधारित उत्पादने, उच्च क्षमतेचे संगणक उपाय आणि भविष्यातील डिजिटल परिवर्तनाबाबत सविस्तर माहिती दिली. या संवादातून उपस्थितांना जागतिक तंत्रज्ञानातील नव्या घडामोडींची माहिती मिळाली.

या कार्यक्रमास ब्रांच सेल्स मॅनेजर श्रीकांत म्हस्के, ब्रांच प्रॉडक्ट मॅनेजर अनिल पंचाघरे, वेस्ट मार्केटिंग मॅनेजर अतुल पवार, एरिया सेल्स मॅनेजर अविनाश बडगुजर, सेल्स मॅनेजर राहुल चौधरी यांच्यासह संगणक क्षेत्रातील व्यावसायिक, तंत्रज्ञान अभ्यासक, ग्राहक आणि विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. अर्नाल्ड सु यांच्या भेटीमुळे अहिल्यानगरच्या आयटी क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून जागतिक तंत्रज्ञान क्षेत्राशी शहराची नाळ अधिक दृढ झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात शालेय साहित्य वाटप व वृक्षारोपण



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गावचे सुपुत्र व उद्योजक गोरख भालके यांच्या वतीने पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी शालेय बॅग, स्टेशनरी साहित्य वाटप तसेच वृक्षारोपणाचा सामाजिक उपक्रम उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत उपलब्ध करून देण्याबरोबरच शिक्षण व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते विद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी वृक्षांचे संगोपन करून पर्यावरण रक्षणासाठी योगदान देण्याचा संकल्प केला. त्यानंतर गोरख भालके यांच्या वतीने इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना शालेय बॅग व पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना विविध स्टेशनरी साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी 'सकाळ'चे संपादक प्रकाश पाटील यांच्या हस्ते गोरख भालके यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व स्टेशनरीचे वाटप केले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना उद्योजक गोरख भालके म्हणाले, ''मी ज्या गावात लहानाचा मोठा झालो, त्या गावाशी माझे जिव्हाळ्याचे नाते आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य मिळावे आणि त्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. आज ग्रामीण भागातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असल्याचे चित्र चिंताजनक आहे. गावातील शाळा टिकून राहण्यासाठी पालक, ग्रामस्थ आणि समाजातील सर्व घटकांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे. शिक्षण हीच समाज परिवर्तनाची खरी ताकद असून विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून आपले भविष्य उज्ज्वल करावे.

याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी शिक्षण हेच विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचे प्रभावी साधन असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, शाळांप्रती विद्यार्थ्यांची ओढ वाढावी आणि शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम व्हावे यासाठी अशा सामाजिक उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तसेच ग्रामीण भागातील शाळांचे अस्तित्व टिकविण्यासाठी पालक व ग्रामस्थांनीही पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.

गोरख भालके यांनी आपल्या सामाजिक बांधिलकीतून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत शिक्षण क्षेत्राला हातभार लावला. त्यांच्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य दिनूकाका पंदरकर, पिंपळगाव पिसाचे सरपंच किशोर बापू पंदरकर, 'सकाळ'चे वितरण व्यवस्थापक देविदास आंधळे, डॉ. चंद्रकांत पंदरकर, समता विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे अध्यक्ष गणेश पंदरकर, दादा पंदरकर, उद्योजक अजय राऊत, विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. एम. राऊत, कदम सर, कळमकर सर, लगड सर, गायकवाड सर, पवार सर, कामडी सर, खामकर सर, प्रशांत शेलार, दिवटे मॅडम तसेच शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पल्स पोलिओ जनजागृतीसाठी शहरातून निघाली रॅली

## पोलिओमुक्त समाजासाठी सर्वांचा पुढाकार महत्त्वाचा – संजय गुगळे

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** महानगरपालिका, जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्र व जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पल्स पोलिओ जनजागृती अभियानांतर्गत भव्य रॅली काढण्यात आली. रविवारी (दि.२८ जून) रोजी अहिल्यानगर सर्वत्र लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर रॅलीद्वारे बालकांना पोलिओचा डोस पाजून समाज पोलिओमुक्त करण्याचे आवाहन करण्यात आले.

या रॅलीचा शुभारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय, स्टेशन रोड येथून करण्यात आला. रॅलीचे उद्घाटन आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर व मातांच्या उपस्थितीत फुगे सोडून झाले. रॅली मधील विद्यार्थ्यांनी चौका-चौकात पोलिओच्या जागृतीसाठी पथनाट्य सादर केली. याप्रसंगी जायंट्स वेल्फेअर फाऊंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे, जनआरोग्य समितीच्या सदस्या विद्या तन्वर, जायंट्स ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, अनिल गांधी, अमित मुनोत, पूजा पातुरकर, रिया पवार नुतन गुगळे, मुख्याध्यापक विजय दिघे, जिजामाता प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. आयेशा शेख व डॉ. नितीन जगताप उपस्थित होते.

वैद्यकीय अधिकारी डॉ. आयेशा शेख व डॉ. नितीन जगताप यांनी पोलिओमुक्त समाज घडविण्याबात उपस्थितांना मार्गदर्शन केले. शिवनेरी चौक व गवळीवाडा परिसरातून निघालेल्या या रॅलीत विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी ''दो बूंद पोलिओ के'', ''पोलिओला नाही म्हणा'' असे फलक हात घेऊन जनजागृती केली.

या जनजागृती रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना जायंट्स ग्रुपतर्फे संजय गुगळे यांच्या हस्ते प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. यावेळी पल्स पोलिओ लसीकरणाचे महत्त्व, वेळापत्रक आणि ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना २ थेंब पाजण्याची गरज याबत सविस्तर माहिती दिली.

संजय गुगळे म्हणाले की, पोलिओमुक्त समाजासाठी सर्वांचा पुढाकार महत्त्वाचा आहे. ''पल्स पोलिओ लसीकरण करणे आवश्यक असून पोलिओमुक्त अहिल्यानगर ही महानगरपालिकेची संकल्पना आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी आपल्या ५ वर्षांखालील मुलांना लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.'' या उपक्रमासाठी आरोग्य सेविका, शिक्षक व सर्व परिचारिका यांनी मोलाचे सहकार्य केले. ही रॅली यशस्वी होण्यासाठी सुवर्णा शेलार यांच्यासह परिचारिका व आशा स्वयंसेविका यांनी परिश्रम घेतले.

# शालेय मुलींच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासन सज्ज; छेडछाड करणाऱ्यांची आता खैर नाही - सपोनि भरत मोरे

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**पैठण–** शालेय मुलींच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत एमआयडीसी पैठण पोलीस ठाण्याच्या वतीने विविध शाळांमध्ये जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. मुलींना सुरक्षित व निर्भय वातावरण मिळावे यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध असून छेडछाड, त्रास देणे अथवा महिलांविरोधातील कोणत्याही प्रकारच्या गुन्ह्यांना कठोरपणे आळा घातला जाणार असल्याचे प्रतिपादन एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भरत मोरे यांनी केले.

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जायकवाडी प्राथमिक शाळा, शाहू विद्यालय, साखर कारखाना प्राथमिक शाळा, ढाकेफळ, ढोरकीन, वाहेगाव, ईसरवाडी, बालानगर, दरेगाव आदी गावांतील शाळांमध्ये विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मुलींना 'गुड टच-बॅड टच', सायबर गुन्हे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, महिला हेल्पलाइन व आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांशी संपर्क साधण्याबाबत माहिती देण्यात आली.

तसेच शाळा परिसरात संशयास्पद हालचाली करणाऱ्या व्यक्तींवर पोलीस प्रशासनाचे बारकाईने लक्ष असून मुलींची छेडछाड करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही सपोनि भरत मोरे यांनी दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढला असून पालक व शिक्षकांनीही पोलीस प्रशासनाच्या या पुढाकाराचे स्वागत केले आहे.

# पहिल्याच प्रयत्नात सीए फायनल उत्तीर्ण; अहिल्यानगरच्या आदित्य खरदासचे घवघवीत यश

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया तर्फे मे २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या सीए फायनल परीक्षेत अहिल्यानगरच्या आदित्य संजय खरदास याने पहिल्याच प्रयत्नात यश मिळवत चार्टर्ड अकाउंटंट (सीए) होण्याचा मान मिळविला आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे शहरासह विविध स्तरांतून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

आदित्यने यापूर्वी सीए फाउंडेशन तसेच सीए इंटरमिजिएट या दोन्ही परीक्षाही पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण करून आपल्या सातत्यपूर्ण मेहनतीची आणि गुणवत्तेची छाप पाडली होती. आता सीए फायनल परीक्षेतही प्रथम प्रयत्नात यश मिळवत त्याने आपल्या शैक्षणिक कारकिर्दीत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

आदित्यचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण बाई ईचरज बाई व भाऊसाहेब फिरोदिया विद्यालय, अहिल्यानगर येथे झाले. त्यानंतर अकरावी व बारावीचे वाणिज्य शाखेचे शिक्षण त्याने न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथे पूर्ण केले.

आदित्य हा कै. किसन चंद्रय्या खरदास, सहकार खात्यातील सेवानिवृत्त ऑडिटर यांचा नातू आहे. तसेच पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचारी सहकारी पतसंस्था, अहिल्यानगर येथील वरिष्ठ लिपिक संजय किसन खरदास आणि श्री मार्कंडेय विद्यालय, अहिल्यानगर येथील शिक्षिका रेणुका संजय खरदास (दासरी) यांचा सुपुत्र आहे.
कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्य यांच्या बळावर मिळविलेल्या या यशाबद्दल आदित्य खरदास याचे शैक्षणिक, सामाजिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# सूर्या फाउंडेशन व आयुष मंत्रालय भारत सरकार आयोजित शारीरिक व मानसिक संतुलन राखण्यासाठी मार्गदर्शन

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थी व शिक्षकांना योगाचे महत्त्व, त्याचे आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम तसेच दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करण्याचे फायदे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे मार्गदर्शन करणारे प्रमुख पाहुणे डॉक्टर रमेश तेवानी जे संत हेरजाराम मेडिकल कॉलेज ऑफ नॅचरोपॅथी अँड योगिक सायन्स चे संस्थापक आणि आरोग्य केंद्र भोपाळचे नोंदणीकृत अधिकारी आहेत. फक्त भारतातच नव्हे तर जगभरात आरोग्य जनजागृती कार्यक्रम त्यांनी केले आहेत व करत आहेत गेल्या पन्नास वर्षांपासून त्यांनी एकही औषध न घेता निसर्गोपचाराच्या मदतीने निरोगी जीवन कसे जगावे

याचे बहुमोलाचे मार्गदर्शन करत मानवतेची सेवा ते करत आहेत . या कार्यक्रमा दरम्यान डॉक्टर सुभाष दत्तात्रय जाधव योगा एक्सपर्ट यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने व प्राणायामाच्या प्रात्यक्षिकांचे धडे देऊन महत्व पटवून दिले. शाळेतील शिक्षकांनी योगामुळे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य कसे सुधारते याबाबत माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना संतुलित व पौष्टिक आहाराचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. निरोगी जीवनशैलीसाठी योग्य आहार, फळे, भाज्या, दूध व पौष्टिक पदार्थांचे सेवन करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच जागतिक संगीत दिनानिमित्त शाळेतील संगीत शिक्षक श्री पठारे यांनी एक भावनिक गीतातून जागतिकसंगीत दिनाचे महत्त्व पटवून दिले व विद्यार्थ्यांनी संगीत दिनानिमित्त संगीतातील विविध उपक्रम तयार केले.

विद्यार्थ्यांनी योगासने करून आरोग्यदायी जीवनाचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या प्राचार्या गीता तांबे यांनी योग व पोषणयुक्त आहार यांचा अंगीकार करून निरोगी, सुदृढ आणि आनंदी जीवन जगण्याचा संदेश दिला . तसेच प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका कंचन पापडेजा यांनी योगाचे महत्त्व विशद केले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली . या कार्यक्रमासाठी सूर्या फाउंडेशनच्या डॉ.प्रेरणा नाबरिया ,श्रीभारत बागरेचा ,श्री दीपक पापडेजा ,श्री अमर अगरवाल सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका गीता दुमाटे यांनी केले. तसेच शाळेतील क्रीडाशिक्षक श्री अमोल धोपावकर व प्रियंका मंगलारप यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कर्मयोगी आबासाहेब काकडे हे देशव्यापी व्यक्तिमत्व होते – डॉ.पुरुषोत्तम भापकर

## आबासाहेब काकडे यांचा १०७ वा जयंती कार्यक्रम आबासाहेब काकडे विद्यालयात संपन्न

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**


(छाया : बाबा पालवे)

**अहिल्यानगर–** आबासाहेबांनी फुले, शाहू, आंबेडकर यांच्या प्रमाणेच शेतकरी, कष्टकरी, दीनदलित, गोरगरीब यांच्यासाठी आपले आयुष्य खर्च केले. आबासाहेबांचा हा जनहिताचा वारसा आज अ‍ॅड. विद्याधर काकडे व सौ.हर्षदा काकडे मोठ्या नेटाने पुढे चालवत असल्याचे प्रतिपादन सेवानिवृत्त विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी शेवगाव येथे केले.

आज दि.२५ रोजी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे संस्थापक कर्मयोगी जगन्नाथ कान्होजी उर्फ आबासाहेब काकडे यांचा १०७ वा जयंती कार्यक्रम आबासाहेब काकडे विद्यालय, येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थितीत शेषराव देशपांडे, समूहाचे अध्यक्ष अ‍ॅड. डॉ. विद्याधर काकडे, विश्वस्त सौ.हर्षदाताई काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विद्यालयाचे प्राचार्य डॉ.लक्ष्मण बिटाळ, उपप्राचार्य श्री. अशोक तमनर , भारतीय सैन्य दलातील राजपत्रित अधिकारी वर्ग १ अधिकारी नवनाथ काटे, डॉ. सुरेश पाटेकर, डॉ. भागिनाथ काटे, जगन्नाथ गावडे, सौ.सुमनताई गावडे, लक्ष्मण गवळी, विजय मुधोळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ.भापकर म्हणाले की, कर्मयोगी आबासाहेब काकडे हे एक देशव्यापी व्यक्तिमत्व होते. त्यांच्या प्रेरणेमुळेच मला शासकीय सेवेत विविध समाज उपयोगी कार्य करता आली. मी या समूहाचा माजी शिक्षक असल्याचा मला अत्यंत अभिमान आहे. आबासाहेबांनी फुले, शाहू ,आंबेडकर यांच्या प्रमाणेच शेतकरी, कष्टकरी, दीनदलित, गोरगरीब यांच्यासाठी आपले आयुष्य खर्च केले. आबासाहेबांचा वारसा आज त्यांचे चिरंजीव अ‍ॅड.डॉ.विद्याधर काकडे तथा स्नुषा सौ.हर्षदा काकडे मोठ्या नेटाने पुढे चालवत आहेत. विद्यार्थ्यांनी आबासाहेबांच्या जीवनावरील पुस्तके वाचून त्यातून प्रेरणा घेऊन स्वत:तील क्षमता ओळखून आपले आयुष्य घडवावे असेही ते म्हणाले.

शेषराव देशपांडे म्हणाले की, आबासाहेबांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शाळा, वसतिगृहे चालवली. कर्म हीच पूजा मानून त्यांनी आपले जीवन समाजासाठी खर्च केले. आबासाहेबांविषयीच्या स्वतः च्या काही आठवणीही यावेळी त्यांनी सांगितल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. लक्ष्मण बिटाळ यांनी सूत्रसंचालन प्रा. जरीना शेख यांनी तर समारोप वंदे मातरम या राष्ट्रीय गीताने झाला. कार्यक्रमास संस्थेतील आजी-माजी प्राचार्य, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आबासाहेब काकडे यांच्या जयंतीनिमित्त शाळेमध्ये पंधरा दिवसांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# डॉ.विखे पाटील कृषी महाविद्यालयाला महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडून अ दर्जा प्राप्त

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कृषी महाविद्यालयाला राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्या मूल्यांकन प्रक्रियेमध्ये अ दर्जा प्राप्त झाला आहे. ही कामगिरी महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवता, संशोधन कार्य, विस्तार शिक्षण उपक्रम, पायाभूत सुविधा तसेच विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांची पोचपावती मानली जात आहे.

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे मान्यताप्राप्त तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न असलेल्या या महाविद्यालयाने गुणवत्तापूर्ण कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्याच्या माध्यमातून उल्लेखनीय प्रगती साधली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक सुविधा, सुसज्ज प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापकवर्ग आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम यामुळे महाविद्यालयाने कृषी शिक्षण क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या मूल्यांकन समितीने महाविद्यालयातील शैक्षणिक, संशोधन, विस्तार शिक्षण, प्रशासकीय व्यवस्था, पायाभूत सुविधा तसेच विद्यार्थी कल्याणविषयक उपक्रमांचे मूल्यमापन करून महाविद्यालयास अ दर्जा प्रदान केला आहे. हा दर्जा महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्ता वृद्धीचा आणि उत्कृष्ट कार्याचा गौरव असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. बी.राऊत यांनी सांगितले.

या यशामागे संस्थेचे सचिव डॉ.पी.एम. गायकवाड, संचालक डॉ. अभिजित दिवटे, तंत्र संचालक सुनील कल्हापुरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा राज्याचे जलसंपदा मंत्री श्री.राधाकृष्ण विखे पाटील संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा.डॉ.सुजय विखे पाटील यांनी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. भविष्यातही महाविद्यालय शैक्षणिक गुणवता, संशोधन आणि कृषी क्षेत्रातील उत्कृष्टता कायम राखत नवे मानदंड प्रस्थापित करेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या यशाबद्दल महाविद्यालया तील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी यांनी आनंद व्यक्त केला.संस्थेच्या प्रगतीमध्ये योगदान देणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत. महाविद्यालय भविष्यातही कृषी शिक्षण, संशोधन आणि शेतकरी हिताच्या उपक्रमांद्वारे कृषी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

(पान १ वरून)

## मानसिक त्रास दिला जात असल्याची निंबळकमधील दिव्यांग कीर्तनकाराची तक्रार

पायी दिंडी सोहळ्याच्या पत्रिकेतून, धार्मिक कार्यात राजकारण नको म्हणून सर्व भाविकांच्या संमतीने राजकीय नेत्यांची नावे वगळण्यात आली होती. याचाच राग मनात धरून संशयित आरोपी तुकाराम हनुमंत गेरंगे (रा. निंबळक/इसळक) यांनी गेल्या दोन महिन्यांपासून महाराजांना त्रास देण्यास सुरुवात केली. दिनांक १९ जून रोजी दुपारी निंबळक बायपास चौकात आरोपीने जालिंदर महाराज यांचा पाठलाग करून, ''तुझा काटाच काढतो,'' अशी जीवे मारण्याची धमकी दिली. पीडित महाराज ७० टक्के दिव्यांग असून, आरोपीने त्यांच्या अपंगत्वाचा उल्लेख करून ''तुला गावात राहू देणार नाही'' असा जातिवाचक व अपमानास्पद शब्दप्रयोग केला. तसेच, स्थानिक वृत्तपत्रात मानवाधिकार संस्थेच्या नावाचा गैरवापर करून महाराजांची बदनामी केली, आणि मोबाईलवर मेसेज पाठवून खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिली, असे तक्रारीत म्हटले आहे.
पोलिसांनी या प्रकरणाची दखल घेऊन आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत तातडीने गुन्हा दाखल करावा, अशी मागणी तक्रारअर्जात करण्यात आली आहे.

## ट्रॅक्टर भाड्याने पाहिजे अशी पोस्ट टाकून फसवणारा भामटा जेरबंद

मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि हेमंत थोरात यांच्या पथकाने व्यापक मोहीम राबवून आरोपी मल्हार जायभाये याला बेड्या ठोकल्या. त्याच्याकडून शिंदे यांचा ट्रॅक्टर जप्त करण्यात आला.

अधिक चौकशी केली असता, आरोपीने फेसबुकवरील ट्रॅक्टर खरेदी-विक्री पेजचा वापर करून प्रदीप काशिनाथ जगताप (रा. भगाव, ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर) यांचीही अशाच पद्धतीने फसवणूक केल्याचे समोर आले. आरोपीकडून जगताप यांचाही आयशर कंपनीचा ट्रॅक्टर (क्र. २७ ५६७७) हस्तगत करण्यात आला आहे.या कारवाईत पोलिसांनी एकूण ९ लाख रुपयांचे दोन ट्रॅक्टर जप्त केले असून, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राकेश खेडकर पुढील तपास करत आहेत.

## शिर्डीत एफडीएची पुन्हा मोठी कारवाई; प्रसादाच्या पेढ्यांच्या विक्री केंद्रांवर धाडी

केंद्रांवर आणि पेढा उत्पादन करणार्या ठिकाणी तपासणी मोहीम राबवली. यावेळी मोठ्या प्रमाणावर संशयित पेढा आढळून आल्याने त्याचे नमुने ताब्यात घेण्यात आले. भेसळीचा संशय आणि निकृष्ट दर्जा लक्षात घेऊन सुमारे ६०० किलोहून अधिक पेढा नष्ट करण्यात आला. साईमंदिर परिसरात भेसळयुक्त आणि बनावट पेढ्यांची विक्री होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. पेढा विक्री केंद्रे तसेच उत्पादन युनिटची तपासणी करून नमुने घेण्यात आले आहेत. भाविकांना दर्जेदार आणि सुरक्षित प्रसाद मिळावा यासाठी प्रशासन सतर्क असून अशी कारवाई यापुढेही सुरू राहणार असल्याचे एफडीएच्या अधिकारी अपर्णा भोईटे यांनी सांगितले दरम्यान, शिर्डीत लाखो भाविक प्रसाद म्हणून पेढ्यांची खरेदी करतात. त्यामुळे श्रद्धेच्या नावाखाली सुरू असलेल्या या प्रकारामुळे संताप व्यक्त होत आहे.

## आयुक्त मुंढेंच्या बदलीच्या चर्चांना पूर्णविराम

साहित्याचा ७४ लाख ८५ हजार ५०० रुपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे. भेसळ रोखण्यासाठी विभागाकडून कठोर कारवाई सुरू असून ती यापुढेही कायम राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या बदलीबाबत सुरू असलेल्या चर्चांवर उत्तर देताना मंत्री झिरवाळ यांनी ''सबंधित आयुक्तांची बदली करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही'' असे ठाम विधान केले. त्यामुळे राज्यभरातील नागरिक, ग्राहक संघटना आणि भेसळविरोधी मोहिमेला पाठिंबा देणाऱ्या घटकांच्या मनातील संभ्रम दूर झाला आहे. आमदार काशिनाथ दाते यांनी उपस्थित केलेल्या या लक्षवेधीमुळे केवळ भेसळीचा गंभीर प्रश्न सभागृहात चर्चिला गेला नाही, तर राज्यातील भेसळविरोधी कारवाईचे नेतृत्व करणारे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याबाबत शासनाची भूमिका देखील स्पष्ट झाली. त्यामुळे भेसळ माफियांविरोधातील मोहीम अधिक प्रभावीपणे पुढे सुरू राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## वेदपाठशाळा व वैदिक कार्यासाठी राज्य शासनाच्या अनुदानाची गरज - सुधीरदास महंत

समाज देखील सहभागी होत आहे. वेदपाठशाळांमध्ये देखील सर्व जातीतील विद्यार्था वेदाध्ययन करत आहेत, ही आनंदाची बाब आहे. आज महाराष्ट्रातील अनेक वेदपाठशाळांना जागेची कमतरता आहे तर आर्थिक स्थिती हलाखीची आहे. यासाठी सर्व समाजाने आर्थिक पाठबळ देण्याबरोबरच राज्य शासनाने देखील या कार्याची दखल घेत भरघोस अनुदान देण्याची गरज आहे.यावेळी खासदार मेधा कुलकर्णी म्हणाल्या की, सध्याच्या काळात वेदांचा आणि ग्रंथांचा अभ्यास करून आपली हिंदू संस्कृती, वैदिक परंपरा पुढे नेण्यासाठी सर्वस्तरावरुन प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे, सरकारने काही उपक्रम देखील सुरु केले आहेत.

यावेळी करंबेळकर, पाचलग आणि शहाणे यांनी सत्काराला उत्तर देतांना मनोगत व्यक्त केले. यावेळी आर्किटेक्ट हृषिकेश कुलकर्णी, ज्येष्ठ उद्योजक जयंत दीक्षित, हर्षवर्धन भावे, श्रीकृष्ण चितळे, अभिरुचीचे सुनिल भिडे, युवा उद्योजक अनिकेत मालशे यांचा सन्मान करण्यात आला तर पुस्तक परिक्षणांचा विश्वविक्रम करणारे समीर गुधाटे व केंद्र सरकारच्या सांस्कृतिक संबंध परिषदेच्या मान्यताप्राप्त यादीतील अंधगायक निनाद शुक्ल यांचा विशेष सत्कार करण्यात आला. भालचंद्र कुलकर्णी यांनी सर्वांचे स्वागत केले व उपस्थितांचे आभार मानले तर संजय ओर्पे यांनी ब्राह्मण व्यावसायिकांसाठी करत असलेल्या विविध प्रकल्पांची यावेळी माहिती दिली. ज्येष्ठ अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी सूत्रसंचालन केले तर वैशाली जोशी यांनी गायलेल्या संपूर्ण वंदेमातरमने कार्यक्रमाची सांगता झाली.